# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक १८/०६/२०२२ (शनिवार)**

**(सायंकाळ)**

---

### अकस्मात मृत्यू

१) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत ११ कि. मी. अंतरावरील मौजा सावळी खुर्द शिवार दि ११/०६/२०२२ रोजी १८/०० वा. दरम्यान **सुरेश गंगाधर कुकडे (मृतक), वय ५२ वर्षे, रा. सावळी खुर्द** याने दारूच्या नशेत स्वताचे शेतात जावुन विषारी औषध प्राषण केले. त्याची प्रकृती खराब झाल्याने त्याला प्रथम उपचारकामी ग्रामीण रूग्णालय कळमेश्वर येथे नेवून तेथील डॉक्टरांनी रेफर केल्याने मेयो हॉस्पीटल नागपुर येथे दि ११/०६/२२ रोजी २२.२५ वा. भरती केले असता डॉक्टरांनी तपासुन मृत झाल्याचे घोषीत केले. सदर मेयो सुचणेवरून मर्ग दाखल करून चौकशीत घेतला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार दिपक वाळके मेयो पोलिस बुथ नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार लक्ष्मण रूडे हे करीत आहे.

२) पो.स्टे. बोरी :– अंतर्गत ०४ कि. मी. अंतरावरील ग्रामपंचायत सातगाव वेणा नगर जवळ येथे दिनांक १३/०६/२०२२ चे १०.०० वा. सुमारास **दिवाकर रमेश चचाने(मृतक), वय ३२ वर्ष रा. सातगाव झोपडपट्टी कन्हाळगाव** हा त्याचे घरावरील काम पाहत असतांना त्याचा तोल गेल्याने खाली पडला. त्यास प्रथम माया हॉस्पीटल बुटीबोरी व त्यानंतर मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता दि १६/०६/२२ चे ११.५० वा डॉक्टरांनी तपासुन मृत घोशीत केले. सदर मृतकाचे पी एम करून मेडीकल कॉलेज पोलीस बुथ नागपुर येथुन कागदात्र प्राप्त झाल्याने सदरचा मर्ग दाखल करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक युनुस खान पो.स्टे. बोरी यांचे रिपार्ट वरून पो.स्टे. बोरी येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार संजय खंडारे मो.क्र. ९९२३१५९१५३ हे करीत आहे.

३) पो.स्टे. खापा :– अंतर्गत ०७ कि. मी. अंतरावरील मौजा मेंडाळा शिवार येथे दिनांक १०/०६/२०२२ चे २१.३० वा. सुमारास **अब्दुल हमीम अब्दुल हकिम कुरेशी(मृतक), वय ३० वर्ष, रा. खैरी घेराड** याने विषारी औषध प्राशन केल्याने खापा पोलीसांना सदर मृतक याला मेयो हॉस्पीटल येथे भरती केले असता उचारदरम्यान दि. १५/६/२२ चे १३.०० वा. डॉक्टर यांनी सदर इसमास तपासापुन मृत घोषीत केले. सदर कागदपत्रे पोस्टे. खापा येथे टपाली व्दारे प्राप्त असता सदर मर्ग नोंद करून चौकशीत आहे

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस हवालदार प्रदीप ठाकुर मेयो पोलिस बुथ यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार मुकुंदा लोंदे मो.क्र. ९९२३४१०२२३ हे करीत आहे.

## सर्पदंशामुळे मृत्यु

**पो.स्टे. खापा** :– अंतर्गत मौजा बडेगाव येथे दिनांक १५/०६/२०२२ चे १४.०० वा. दरम्यान **मोन्टी प्रकाश डाखोळे (मृतक), वय १७ वर्ष, रा. बडेगाव** हा घरचे बाजुला संतोष हॉटेल बडेगाव येथे गावत झाडु मारत असतांना तिथे असलेल्या सापाने त्याला उजव्या अंगठयाला चावा घेतल्याने त्याच प्रकृती खराब झाली. त्यास उपचाराकामी प्रथम बडेगाव येथे नेले व पुढील उपचाराकरिता मेयो हॉस्पीटल येथे भरती केले असता डॉक्टरांनी दि. १५/६/२२ चे १५.३५ वा. त्याला तपासुन मृत घोषीत केले. आज रोजी पोशि ब.न.९४४ यांनी सद कागदपत्रे पोस्टेला टपाली व्दारे प्राप्त असता सदर मर्ग नोंद करून चौकशीत आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलीस हवालदार श्री. नशीर कुरेशी मेयो पोलिस बुथ यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. खापा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार बन्सोडे मो.नं ९९२३४१०२२३ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर